## प्राइम सिक्युरिटीज लिमिटेड

(सीआयएन: एल६७१२०एमएच१९८२पीएलसी०२६७२४)
**नोंदणीकृत कार्यालय:** ११०९/१११०, मेकर चेंबर V, नरिमन पॉइंट, मुंबई ४०००२१
**दूर.:** +९१-२२-६१८४२५२५ **फॅक्स:** +९१-२२-२४९७०७७७
**वेबसाइट:** www.primesec.com **ईमेल:** prime@primesec.com

PRIME

### ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **प्राइम सिक्युरिटीज लिमिटेड (''कंपनी'')** च्या सदस्यांची **४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') मंगळवार, २९ सप्टेंबर, २०२६ रोजी सायं. ४:०० वा. भाप्रवे व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'') / अन्य ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे (''ओएव्हीएम'')** घेण्यात येईल.

निगम व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या १९ सप्टेंबर, २०२४ दिनांकित सर्क्युलर क्र. ९/२०२४ आणि सेबीद्वारे जारी ३ ऑक्टोबर, २०२४ दिनांकित सेबी सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२४/१३३ नुसार, वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना **सोमवार, ७ सप्टेंबर, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी** केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अशा सदस्यांना पाठविण्यात येईल, ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी किंवा रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट (**''आरटीए''**) किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत केलेले नाहीत, अशा सदस्यांना अचूक मार्गासह वार्षिक अहवाल पाहण्यासाठी वेब-लिंक देणारे पत्र पाठविण्यात येईल. सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या www.primesec.com या वेबसाइटवर अपलोड करण्यात आला आहे आणि तो स्टॉक एक्सचेंजेसच्या संबंधित वेबसाइट विभागांवर म्हणजेच बीएसई लिमिटेड (www.bseindia.com), नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) तसेच एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या वेबसाइटवरही पाहता येईल.

**ई-मतदान:**

कंपनीने सर्व सदस्यांना एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, जेणेकरून ते ४३ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आपले मत देऊ शकतील आणि या उद्देशासाठी कंपनीने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान सुलभ करण्यासाठी एनएसडीएलची नियुक्ती केली आहे. **मंगळवार, २२ सप्टेंबर, २०२६ (''कट-ऑफ तारीख'')** रोजी समभाग धारण करणारे सर्व सदस्य इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आपले मत देऊ शकतात. सदस्यांनी खालील बाबींची नोंद घ्यावी:

ए) ई-मतदानाचा कालावधी **शनिवार, २६ सप्टेंबर, २०२६ रोजी स. ९:०० वा. भाप्रवे** ला सुरू होईल आणि **सोमवार, २८ सप्टेंबर, २०२६ रोजी सायं. ५:०० वा. भाप्रवे** ला समाप्त होईल. त्यानंतर एनएसडीएलद्वारे दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल निष्क्रिय करण्यात येईल आणि उक्त तारीख व वेळेनंतर सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही. सदस्याने एकदा मत दिल्यानंतर, त्याला त्यामध्ये त्यानंतर बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

बी) सदस्यांचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ तारखेला कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलामधील त्यांच्या समभागाच्या प्रमाणात असतील. सभेला उपस्थित राहणारे आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आधीच आपले मत दिलेले नाही, असे सदस्य सभेदरम्यान त्यांचा मतदानाचा अधिकार बजावू शकतील. कट-ऑफ तारखेला ज्या व्यक्तीचे नाव सदस्यांच्या नोंदवहीत/ लाभकारी मालकांच्या नोंदवहीमध्ये नोंदलेले असेल, केवळ तीच व्यक्ती दूरस्थ ई-मतदानाची सुविधा वापरण्यास पात्र असेल.

सी) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांसाठी आणि ज्यांनी त्यांचा ईमेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही अशा सदस्यांसाठी दूरस्थपणे ई-मतदान करण्याची पद्धत एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आली आहे.

डी) एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे समभाग संपादन करून कंपनीचा सदस्य होणारी आणि कट-ऑफ तारखेला समभाग धारण करणारी कोणतीही व्यक्ती एनएसडीएलला evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवून किंवा एनएसडीएलने दिलेल्या क्रमांकावर (+९१-२२-४८८६७०००) संपर्क साधून दूरस्थ ई-मतदानासाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकते. कट-ऑफ तारखेला सदस्य नसलेल्या व्यक्तीने एजीएमची ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशासाठी समजावी.

इ) ज्या सदस्यांनी एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आधीच आपले मत दिले आहे, त्यांना एजीएममध्ये सहभागी होण्याचा अधिकार असेल, परंतु ज्या ठरावांवर सदस्याने एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आधीच मत दिले आहे, त्या ठरावांवर त्याला पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही.

मे. प्रमोद एस. शाह अँड असोसिएट्स, कार्यरत कंपनी सचिव (सदस्यत्व क्र. एफसीएस ३८०४) चे श्री. प्रमोद एस. शाह (एफसीएस: ३३४) यांची एजीएमपूर्वी आणि एजीएमदरम्यान दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी स्क्रुटिनायझर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. एजीएमपूर्वी आणि एजीएमदरम्यान झालेल्या दूरस्थ ई-मतदानाचे निकाल एजीएमच्या समाप्तीपासून ४८ तासांच्या आत घोषित करण्यात येतील. घोषित निकाल स्क्रुटिनायझरच्या अहवालासह कंपनीच्या https://www.primesec.com/en/annual-reports या वेबसाइटवर, स्टॉक एक्सचेंजेसच्या www.bseindia.com / www.nseindia.com या वेबसाइट्सवर आणि एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या वेबसाइटवर उपलब्ध करून देण्यात येतील.

**प्राइम सिक्युरिटीज लिमिटेडसाठी**
**सही/-**
**अजय शाह**
**कंपनी सचिव**
(एसीएस-१४३५९)

मुंबई
सप्टेंबर ७, २०२६

## टेक्नोक्रॅट्स प्लाझ्मा सिस्टिम्स लिमिटेड

**गाळा क्र. ६, ७, ८, १०५, १०६, १०७, १०८, निरव २, गाव देवी इंडस्ट्रियल इस्टेट, सातिवली, वसई पूर्व, पालघर, ठाणे, ४०१२०८**
**वेबसाइट : www.technocratplasma.com ईमेल : info@technocratplasma.com**

### ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सदस्यांना सूचना, बुक क्लोजर आणि ई-मतदान

याद्वारे सूचना देण्यात येते की **टेक्नोक्रॅट्स प्लाझ्मा सिस्टिम्स लिमिटेड** ('कंपनी') च्या सदस्यांची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम' किंवा 'सभा') सोमवार, २८ सप्टेंबर, २०२६ रोजी दुपारी ३.०० वा. (आयएसटी) केवळ व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') सुविधा / अन्य ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('ओएव्हीएम') एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित करण्यात येईल. दिनांक २२ सप्टेंबर २०२५ च्या जनरल सर्क्युलर क्र. ०३/२०२५ आणि मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स ('एमसीए सर्क्युलर्स') द्वारे जारी करण्यात आलेल्या इतर संबंधित सर्क्युलर्सच्या अनुपालनानुसार कंपन्यांना सदस्यांची समान ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थिती नसताना व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएम आयोजित करण्याची परवानगी आहे.

उपरोक्त सर्क्युलरनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या एजीएमची सूचना समाविष्ट असलेल्या वार्षिक अहवालाच्या (एआर) इलेक्ट्रॉनिक प्रती अशा सर्व सदस्यांना पाठविण्यात येतील, ज्यांचे ई-मेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी)/रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. एजीएमच्या सूचनेच्या प्रत्यक्ष प्रती पाठविण्याची आवश्यकता एमसीए सर्क्युलर्स आणि सेबी सर्क्युलरद्वारे शिथिल करण्यात आली आहे.

कंपनीचा वार्षिक अहवाल २०२५-२६, ज्यामध्ये अन्य बाबींसह ३२ व्या एजीएमची सूचना आणि स्पष्टीकरणात्मक निवेदन समाविष्ट आहे, तो कंपनीच्या www.technocratplasma.com या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइटवर म्हणजेच www.bseindia.com वर उपलब्ध आहे. त्याची प्रत नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ('एनएसडीएल') च्या www.evoting.nsdl.com या वेबसाइटवरही उपलब्ध आहे.

दूरस्थ ई-मतदान: कंपनी अधिनियम, २०१३ ('अधिनियम') च्या कलम १०८ सह वेळोवेळी सुधारित कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) रूल्स, २०१४ च्या नियम २०, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेले जनरल मीटिंग्सवरील सेक्रेटेरियल स्टँडर्ड ('एसएस-२') आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ यांच्या अनुपालनानुसार, कंपनी आपल्या सदस्यांना एजीएममध्ये पार पाडण्यात येणाऱ्या कामकाजाच्या संदर्भात एजीएमपूर्वी तसेच एजीएमदरम्यान दूरस्थ ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करत आहे आणि या उद्देशासाठी कंपनीने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान सुलभ करण्यासाठी एनएसडीएलची नियुक्ती केली आहे.

दूरस्थ ई-मतदानासाठी सविस्तर सूचना एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आल्या आहेत. सदस्यांनी खालील बाबींची नोंद घ्यावी:

अ. दूरस्थ ई-मतदानाची सुविधा खालील कालावधीत उपलब्ध असेल:

| | |
|---|---|
| दूरस्थ ई-मतदान सुरू होणे | शुक्रवार, २५ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ९.०० वा. (आयएसटी) पासून |
| दूरस्थ ई-मतदान समाप्त होणे | रविवार, २७ सप्टेंबर, २०२६ रोजी सायं. ५.०० वा. (आयएसटी) पर्यंत |

त्यानंतर मतदानासाठी दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल एनएसडीएलद्वारे निष्क्रिय करण्यात येईल आणि उक्त तारीख व वेळेनंतर सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही;

ब. सदस्यांचे मतदानाचे अधिकार सोमवार, २१ सप्टेंबर, २०२६ ('कट-ऑफ तारीख') रोजी कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटलमधील त्यांच्या समभागाच्या प्रमाणात असतील. दूरस्थ ई-मतदान प्रणालीची सुविधा सभेदरम्यानही उपलब्ध करून देण्यात येईल आणि सभेला उपस्थित असलेले असे सदस्य, ज्यांनी यापूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले नाही, ते सभेदरम्यान आपला मतदानाचा अधिकार बजावू शकतील. ज्या व्यक्तीचे नाव कट-ऑफ तारखेला रजिस्टर ऑफ मेंबर्स / रजिस्टर ऑफ बेनिफिशियल ओनर्समध्ये नोंदलेले असेल, केवळ तीच व्यक्ती एजीएमपूर्वी / एजीएमदरम्यान दूरस्थ ई-मतदानाची सुविधा वापरण्यास पात्र असेल.

क. सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे समभाग संपादन करून कंपनीचा सदस्य होणारी आणि कट-ऑफ तारखेला समभाग धारण करणारी कोणतीही व्यक्ती, कंपनीने दिलेल्या तरतुदीनुसार evoting@nsdl.co.in किंवा cs@technocratplasma.com येथे विनंती पाठवून दूरस्थ ई-मतदानासाठी लॉगिन-आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकते. कट-ऑफ तारखेला सदस्य नसलेल्या व्यक्तीने एजीएमची सूचना केवळ माहितीच्या उद्देशासाठी समजावी.

ड. सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले सदस्य सभेला इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही.

**ईमेल पत्त्यांची नोंदणी:**

ज्या सदस्यांनी कंपनीकडे आपला ई-मेल पत्ता अद्ययावत केलेला नाही, त्यांनी cs@technocratplasma.com येथे ई-मेल पाठवून आपला ई-मेल पत्ता अद्ययावत करावा.

त्यांच्या ईमेल पत्त्याच्या कायमस्वरूपी नोंदणीसाठी, डीमॅट स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांनी तो त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे अद्ययावत करावा.

याद्वारे पुढे सूचना देण्यात येते की अधिनियमाच्या कलम ९१ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार, कंपनीचे रजिस्टर ऑफ मेंबर्स आणि शेअर ट्रान्सफर बुक्स ३२ व्या एजीएमच्या उद्देशासाठी मंगळवार, २२ सप्टेंबर, २०२६ ते सोमवार, २८ सप्टेंबर, २०२६ (दोन्ही दिवसांसह) बंद राहतील.

**टेक्नोक्रॅट्स प्लाझ्मा सिस्टिम्स लिमिटेडच्या वतीने आणि करिता**
सही/-
अरुण कुमार
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण: मुंबई
दिनांक : ०७/०९/२०२६

**राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणासमोर**
**मुंबई खंडपीठ**
**कंपनी योजना याचिका क्र. 126 OF 2026**
**मध्ये**
**कंपनी योजना अर्ज क्र. 85 /MB/2026**
**बाबत**

कंपनी अधिनियम, 2013;

आणि

कंपनी अधिनियम, 2013 च्या कलम 230 ते 232 सह कलम 52 आणि कलम 66, कंपनीज (कॉम्प्रमाइजेस, अरेंजमेंट्स अँड अमलगमेशन्स) नियम, 2016 सह वाचले असता;

आणि

ओकर अँड ब्लॅक प्रायव्हेट लिमिटेड ("विभक्त होणारी कंपनी / प्रथम याचिकाकर्ता कंपनी"); आणि हाऊस ऑफ अनिता डोंगरे प्रायव्हेट लिमिटेड ("परिणामी कंपनी / द्वितीय याचिकाकर्ता कंपनी") आणि त्यांचे संबंधित भागधारक ("योजना") यांच्यामधील व्यवस्थेच्या योजनेच्या बाबतीत

**ओकर अँड ब्लॅक प्रायव्हेट लिमिटेड** )
कंपनी अधिनियम, 2013 मधील तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेली )
कंपनी अस्तून, तिचे नोंदणीकृत कार्यालय प्लॉट क्र. R 847/1/1, )
टीटीसी औद्योगिक क्षेत्र एमआयडीसी, रबाळे - 400701, महाराष्ट्र, )
भारत येथे आहे. )
सीआयएन: U18209MH2018PTC318048 )
... विभक्त होणारी कंपनी /
प्रथम याचिकाकर्ता कंपनी

**हाऊस ऑफ अनिता डोंगरे प्रायव्हेट लिमिटेड**
कंपनी अधिनियम, 1956 अंतर्गत स्थापन करण्यात आलेली )
कंपनी अस्तून, तिचे नोंदणीकृत कार्यालय प्लॉट क्र. R 847/1/1, )
टीटीसी औद्योगिक क्षेत्र एमआयडीसी, रबाळे - 400701, महाराष्ट्र, )
भारत येथे आहे. )
सीआयएन: U17116MH1995PTC086449 )
... परिणामी कंपनी /
द्वितीय याचिकाकर्ता कंपनी

**संयुक्त याचिकेची सूचना**

कंपनी अधिनियम, 2013 च्या कलम 230 ते 232 आणि कलम 52 व कलम 66 सह कंपनीज (कॉम्प्रमाइजेस, अरेंजमेंट्स अँड अमलगमेशन्स) नियम, 2016 यांच्यासह वाचण्यात येणाऱ्या तरतुदींनुसार, ओकर अँड ब्लॅक प्रायव्हेट लिमिटेड ("विभक्त होणारी कंपनी / प्रथम याचिकाकर्ता कंपनी") आणि हाऊस ऑफ अनिता डोंगरे प्रायव्हेट लिमिटेड ("परिणामी कंपनी / द्वितीय याचिकाकर्ता कंपनी") तसेच त्यांच्या संबंधित भागधारकांमधील व्यवस्थेच्या योजनेला ("योजना") मंजुरी मिळण्यासाठी संयुक्त याचिका, याचिकाकर्ता कंपन्यांनी माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ ('एनसएलटी') समोर सादर केली होती आणि माननीय एनसएलटीने ती 25 ऑगस्ट 2026 रोजी दाखल करून घेतली आहे.

उपरोक्त याचिका माननीय एनसएलटी, मुंबई खंडपीठाच्या खंडपीठ I समोर 24 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 10:30 वाजता सुनावणीसाठी निश्चित करण्यात आली आहे.

जर कोणत्याही संबंधित व्यक्तीस सदर याचिकेस समर्थन करावयाचे किंवा तिचा विरोध करावयाचा असेल, तर त्यांनी त्यांचा/तिचा/त्यांचा अशा हेतूचा लेखी नोटीस, त्यांच्याद्वारे किंवा त्यांच्या अधिवक्त्याद्वारे स्वाक्षरी केलेली, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खाली सही करणाऱ्या अधिकृत प्रतिनिधीकडे, याचिकेच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या किमान 2 दिवस आधी पाठवावी.

ज्या कोणत्याही संबंधित व्यक्तीस उपरोक्त याचिकेचा विरोध करावयाचा असेल, त्यांनी विरोधाची कारणे किंवा त्यासंदर्भातील प्रतिज्ञापत्राची प्रत अशा नोटीससोबत सादर करावी.

कंपनी योजना याचिकेची प्रत तसेच त्यासोबतची सर्व प्रदर्शने, ती आवश्यक असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, याचिकाकर्त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीद्वारे, त्यासाठी निर्धारित शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येईल.

**विरोधाची सूचना बजावण्यासाठी पत्ता:**
प्लॉट क्र. R 847/1/1, टीटीसी औद्योगिक क्षेत्र एमआयडीसी, रबाळे,
नवी मुंबई - 400701

**दिनांक : 07/09/2026**
**ओकर अँड ब्लॅक प्रायव्हेट लिमिटेड साठी**
तरुण पथरिया
अधिकृत प्रतिनिधी
**हाऊस ऑफ अनिता डोंगरे प्रायव्हेट लिमिटेड**
तरुण पथरिया
अधिकृत प्रतिनिधी

## टीपीआय इंडिया लिमिटेड

**सीआयएन: एल२८१२९एमएच१९८२पीएलसी०२६९१७**
प्लॉट क्र. जे-६१, ॲडिशनल एमआयडीसी, मुरबाड, ठाणे, मुराड, महाराष्ट्र, भारत ४२१४०१
**दूरध्वनी क्र.** +९१ ४००२६२१४ | **वेबसाइट:** www.tpiindia.in | **ई-मेल आयडी:** ir@tpiindia.com

### ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना

१. याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कंपनीची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) मंगळवार, २९ सप्टेंबर, २०२६ रोजी दुपारी १२:०० वा. ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे आयोजित करण्यात येईल, ज्यामध्ये सदर सभा बोलावणाऱ्या सूचनेमध्ये आणि त्यासोबतच्या स्पष्टीकरणात्मक निवेदनामध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यात येईल. सदर सभा कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले नियम आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ यांच्या तरतुदींचे पालन करून, दिनांक ५ मे, २०२० चे परिपत्रक क्र. २०/२०२०, दिनांक १३ जानेवारी, २०२१ चे परिपत्रक क्र. ०२/२०२१, दिनांक ८ डिसेंबर, २०२१ चे परिपत्रक क्र. १९/२०२१, दिनांक १४ डिसेंबर, २०२१ चे परिपत्रक क्र. २१/२०२१, दिनांक ५ मे, २०२२ चे परिपत्रक क्र. २/२०२२, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ चे परिपत्रक क्र. १०/२०२२, दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ चे परिपत्रक क्र. ०९/२०२३, दिनांक १९ सप्टेंबर, २०२४ चे परिपत्रक क्र. ०९/२०२४ आणि दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ चे परिपत्रक क्र. ०३/२०२५ तसेच दिनांक ८ एप्रिल, २०२० चे परिपत्रक क्र. १४/२०२०, दिनांक १३ एप्रिल, २०२० चे परिपत्रक क्र. १७/२०२० (एकत्रितपणे ''एमसीए परिपत्रके'' म्हणून संबोधण्यात येणारी) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (''सेबी'') यांनी दिनांक १२ मे, २०२०, १५ जानेवारी, २०२१, १३ मे, २०२२, ५ जानेवारी, २०२३, ७ ऑक्टोबर, २०२३, ३ ऑक्टोबर, २०२४ आणि २६ सप्टेंबर, २०२५ रोजी जारी केलेली परिपत्रके (एकत्रितपणे ''सेबी परिपत्रके'' म्हणून संबोधण्यात येणारी) यांच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येईल. सभासद आगामी एजीएमला ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे उपस्थित राहू आणि सहभागी होऊ शकतील आणि प्रॉक्सी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही. ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे एजीएमला उपस्थित राहणाऱ्या सभासदांची गणना कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत गणपूर्ती निश्चित करण्याच्या उद्देशाने केली जाईल.

२. एजीएमची सूचना आणि **दिनांक ३१ मार्च, २०२६** रोजी समाप्त झालेल्या आर्थिक वर्षासाठी वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती अशा सर्व सभासदांना पाठविण्यात आल्या आहेत, ज्यांचे ई-मेल आयडी कंपनी, डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. ते कंपनीच्या http://www.tpiindia.in/ या वेबसाइटवरही उपलब्ध आहेत. सभासदांनी नोंद घ्यावी की, उपरोक्त दस्तऐवजांच्या प्रत्यक्ष प्रती कंपनीकडून त्यांना उपलब्ध करून दिल्या जाणार नाहीत. ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठविण्याचे काम **०७ सप्टेंबर, २०२६** रोजी पूर्ण झाले आहे.

३. बुधवार, २३ सप्टेंबर, २०२६ या कट-ऑफ तारखेला प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सभासद ४४ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सामान्य आणि विशेष कामकाजावर, एजीएमच्या स्थळाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे (''दूरस्थ ई-मतदान'') इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांचे मत देऊ शकतात. सर्व सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की:

I. एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले सामान्य ठराव इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करून पारित केले जाऊ शकतात.
II. दूरस्थ ई-मतदान **शनिवार, २६ सप्टेंबर, २०२६ रोजी (सकाळी ९.०० वा.)** सुरू होईल.
III. दूरस्थ ई-मतदान **(सोमवार, २८ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा.)** समाप्त होईल.
IV. इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे किंवा एजीएममध्ये मतदान करण्याची पात्रता निश्चित करण्यासाठी कट-ऑफ तारीख **बुधवार, २३ सप्टेंबर, २०२६** आहे.
V. एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स प्राप्त करून कंपनीचा सभासद झालेली आणि कट-ऑफ तारीख म्हणजेच बुधवार, २३ सप्टेंबर, २०२६ रोजी शेअर्स धारण करणारी व्यक्ती, एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या लॉग-इन आयडी आणि पासवर्ड तयार करण्याच्या प्रक्रियेचे पालन करू शकते.
VI. सभासदांनी नोंद घ्यावी की, अ) उपरोक्त तारीख आणि मतदानाची वेळ संपल्यानंतर एनएसडीएलद्वारे दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल निष्क्रिय करण्यात येईल आणि सभासदाने ठरावावर एकदा मत दिल्यानंतर त्याला/तिला त्यामध्ये नंतर बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही; ब) एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेला सभासद एजीएमला उपस्थित राहू शकतो, परंतु त्याला/तिला पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही; क) ज्यांनी यापूर्वी मतदान केलेले नाही अशांसाठी एजीएमच्या कालावधीत ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल; आणि ड) कट-ऑफ तारखेला ज्या व्यक्तीचे नाव सभासद नोंदवहीमध्ये किंवा डिपॉझिटरीजद्वारे ठेवण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये नोंदविलेले आहे, अशाच व्यक्तीला दूरस्थ ई-मतदान तसेच एजीएममध्ये ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची सुविधा वापरता येईल.
VII. एजीएमची सूचना कंपनीच्या http://www.tpiindia.in या वेबसाइटवर तसेच एनएसडीएलच्या https://www.evoting.nsdl.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

४. कोणतेही प्रश्न असल्यास, सभासद https://www.evoting.nsdl.com/ वरील हेल्प विभागात उपलब्ध असलेल्या वारंवार विचारले जाणारे प्रश्न (''एफएक्यू'') आणि ई-मतदान मार्गदर्शिकेचा संदर्भ घेऊ शकतात किंवा evoting@nsdl.com येथे ई-मेल लिहू शकतात किंवा दूरध्वनी क्र.: ०२२-४८८६ ७००० वर संपर्क साधू शकतात, जे इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानाच्या सुविधेशी संबंधित तक्रारीचे निराकरण करतील.

५. कंपनीने ई-मतदान प्रक्रियेची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी **श्री. अभिषेक वाघ (एसीएस-६५३१९), प्रोप्रायटर, मे. अभिषेक वाघ अँड असोसिएट्स, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज** यांची छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे.

६. कंपनीच्या इक्विटी शेअर्सच्या संदर्भातील सभासद नोंदवही आणि शेअर हस्तांतरण नोंदवही **बुधवार, २३ सप्टेंबर, २०२६ ते मंगळवार, २९ सप्टेंबर, २०२६ (दोन्ही दिवस धरून)** बंद राहतील.

संचालक मंडळाच्या वतीने
**टीपीआय इंडिया लिमिटेडसाठी**
सही/-
**भारत सी पारेख**
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ०२६५०६४४

दिनांक: ०७ सप्टेंबर, २०२६
स्थळ: मुरबाड

## एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (शेड्युल्ड कमर्शिअल बँक)

AU SMALL FINANCE BANK — A SCHEDULED COMMERCIAL BANK

**नोंद. कार्यालय : १९-ए, धुळेश्वर गार्डन, अजमेर रोड, जयपूर-३०२००१ (सीआयएन : एल३६९११आरजे१९९६पीएलसी०११३८१)**

### परिशिष्ट IV (नियम ८(I) पहा) कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (शेड्युल्ड कमर्शिअल बँक)** चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ३ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली कोष्टकामध्ये दिलेल्या तपशीलाप्रमाणे सदर सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांत सूचनेत नमूद केलेली रक्कम प्रदान करण्यासाठी कर्जदारांना खालील नमूद तारखेची मागणी सूचना जारी केलेली आहे.

| कर्जदार/सह-कर्जदार/गहाणवटदार/ हमीदाराचे नाव/ कर्ज खाते क्र. | १३(२) सूचनेची तारीख आणि रक्कम | गहाण मिळकतीचे वर्णन | कब्जा घेतल्याची तारीख |
|---|---|---|---|
| **(कर्ज खाते क्र.) एल९०००१०६०१२५०३६७७५,** मे. विशाल ऑइल सेंटर अँड ऑटोमोबाइल्स (कर्जदार), मारोती बापूराव सरवे (सह-कर्जदार), विशाल मारोत्राव सरवे (सह-कर्जदार) | १८-मे-२६ रु. ५,१६,६०१/- रुपये पाच लाख सोळा हजार सहाशे एक मात्र, दिनांक १३-मे-२६ रोजी | निवासी/व्यावसायिक मालमत्ता जमीन / बिल्डिंग / स्ट्रक्चर आणि फिक्स्चर्सचा चे ते सर्व भाग आणि विभाग, येथे स्थित- प्लॉट क्र. १४७५, हाऊस/फ्लॅट क्र. १३१०/६, सर्व्हे क्र. ८, वॉर्ड क्र. १, मौजे- तळेगाव दशासर, तालुका- धामणगाव रेल्वे, जिल्हा- अमरावती, महाराष्ट्र, ४४४७१०, क्षेत्रफळ **मोजमापित १३४.६ चौ.** मीटर. पूर्वेस: रोहिले यांच्या मालकीचे घर, पश्चिमेस: साप्ताहिक बाजार, उत्तरेस: रस्ता, दक्षिणेस: तुळशीराम गायकवाड यांच्या मालकीचे घर | २-सप्टेंबर-२६ |
| **(कर्ज खाते क्र.) एल९००१०६०१२३०२४४६६,** मे. दीप कॉम्प्युटर झेरॉक्स अँड सायबर कॅफे (कर्जदार), शशीम रामाजी वानखडे (सह-कर्जदार), श्रीमती नीता शशीम वानखडे (सह-कर्जदार) | १६-जून-२६ रु. ३,६७,९९४/- रुपये तीन लाख सदुसष्ट हजार नऊशे चौऱ्याण्णव मात्र, दिनांक १६-जून-२६ रोजी | निवासी/व्यावसायिक मालमत्ता जमीन / बिल्डिंग / स्ट्रक्चर आणि फिक्स्चर्सचा चे ते सर्व भाग आणि विभाग, येथे स्थित- सर्व्हे क्र. १६, प्लॉट व्हाइड ऑर्डर एनएपी/३४/बेनोडा/६३/८०-८१, प्लॉट क्र. ७३, मौजे बेनोडा, प्रगणे नांदगाव पेठ, तहसील आणि जिल्हा- अमरावती, महाराष्ट्र, ४४४६०१, क्षेत्रफळ **मोजमापित ९३० चौ. फूट** | ०३-सप्टेंबर-२६ |

कर्जदारांनी सदरहू रक्कम प्रदान करण्यास कसूर के